**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता)**

क्र. पोमसं/८अ/जिल्हा लिपीक संवर्ग-स.सा.ब./प्र.अ.-का.अ./६४/२०१९ मुंबई, दि. ६ /६/२०१९

**-: आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५, शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र. टीआरएन-०३११/१३३५/ प्र.क्र. २२९/ पोल-५ब, दि. २९/३/२०११ अन्वये दिलेले अधिकार आणि शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४१५/ कार्यासन १२, दि. ९/४/२०१८ मधील तरतुदी विचारात घेवून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षकांनी सध्याच्या कार्यालयात बदलीसाठी विहीत केलेला कालावधी पूर्ण केल्यामुळे त्यांची बदली त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र | कार्यालय अधीक्षकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री संतोष नामदेवराव गेडाम | पोलीस अधीक्षक, गोंदीया | पोलीस अधीक्षक, भंडारा |
| २. | श्री. पंडीत गवरलाल चौरे | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे | पोलीस अधीक्षक, नंदुरबार |
| ३. | श्री. विलास राजाराम पवार | पोलीस आयुक्त, ठाणे शहर | पोलीस अधीक्षक, जळगाव |
| ४. | श्रीमती विमल संजय रेंगडे | पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे |
| ५. | श्रीमती किरण राजेंद्र धोटे | पोलीस अधीक्षक, वर्धा | पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, नागपूर (दि. ३०/६/२०१९ रोजी रिक्त होणाऱ्या पदावर) |
| ६. | श्री नागेश काशिनाथ हडपे | पोलीस अधीक्षक, जळगाव | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे |

२. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

i. सदरच्या बदल्या ह्या समुपदेशनाद्वारे बदलीबाबतचे धोरण विचारात घेवून करण्यात आलेल्या आहेत. वर नमूद कार्यालय अधीक्षक यांचे बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी कार्यालय अधीक्षकाची हजर होण्याची वाट न पाहता त्यांचेकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणांची यादी पदमोचक लिपीकवर्गीय अधिकारी किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता द्यावी व दि. ७/६/२०१९ पर्यंत बदली ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

ii. कार्यमुक्तीच्या दिनांकानंतर ते बदली होण्यापूर्वी ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणावरून त्यांचे वेतन अथवा कोणतीही देयके अदा करू नयेत. बदलीनंतर संबंधित कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजू होत नसेल तर अशा कर्मचाऱ्याकविरूध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

iii. बदली ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरूपाची बाब असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यांने राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

iv. बदली झालेल्या कार्यालय अधीक्षकांना संबंधित घटक प्रमुखांनी विनाविलंब रूजू करून घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास कळवावा. एखाद्या कार्यालय अधीक्षकास रूजू करून न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षाकाळ ठरवून काम न देता भत्ते देण्याचा प्रश्न उद्भवल्यास संबंधित घटक प्रमुख जबाबदार राहतील.

v. बदली आदेशानंतर जे कार्यालय अधीक्षक रूग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रूग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand Relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**सु. कु. जायसवाल,**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर / पुणे शहर
पोलीस अधीक्षक, गोंदीया / वर्धा / जळगाव / भंडारा / नंदुरबार / लोहमार्ग, पुणे
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, नागपूर
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे

प्रत माहितीसाठी:-

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, म.रा. पुणे
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र
कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, १२ व ३६

**(मिलिंद भारंबे)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.